# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : २०००/२०२३**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. मारोती रामक्रिष्णा शेटे, ४१, रागमालिका सीएचएस, प्लॉट नं. १५/१६, सेक्टर-५, न्यु पनवेल(ई)-४१०२०६, जि. रायगड | सह जिल्हा निबंधक वर्ग-२, नागपूर (ग्रामीण), सिव्हिल लाईन्स नागपूर | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर(ग्रामीण), नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १०.०२.२०२६**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : २७.०७.२०२३

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ३१.०७.२०२३

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती मिळाली नाही.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २५.०३.२०२३

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २८.०३.२०२३

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सप्टेंबर २०२२

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : Regarding Registration of false sale deed No. ९११/२०२२ of my farmland survey no. ३/९ at chargaon (Mug.) in my absence by sub-registrar office, Bhiwapur, & Cancellation of registration thereof. Action taken report against your letter dated ०९/०१/२०२३, १२/०१/२०२३ & my letter dated १३/०२/२०२३

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती

अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय क्र.९ पुणे यांनी दिनांक ०३.०४.२०२३ रोजी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर शहर, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केला आहे व त्याची प्रत अपिलार्थीस दिलेली आहे.

त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, नागपूर ग्रामीण यांनी दिनांक १८.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, सदर प्रकरणात नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ व ८३ अंतर्गत योग्य ती कार्यवाही करणेबाबत दुय्यम निबंधक श्रेणी-१ भिवापूर यांना या कार्यालयाचे पत्र क्र. का-२/तक्रार/९८०/२०२३ दि. ११.०४.२०२३ अनुसार कळविण्यात आले असून त्याची प्रत यासोबत आपणास पुरविण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०९.०५.२०२३

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील

अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर ग्रामीण यांनी दिनांक ३०.०५.२०२३ रोजी सुनावणी घेवून दिनांक ०१.०६.२०२३ रोजी आदेश पारीत केले आहे. त्यात अपिलर्थी यांचे अपील अंशत: मान्य करण्यात येवून राज्य जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२ नागपूर ग्रामीण यांनी संबंधित अपिलार्थीस माहितीचा अहवालाची प्रत पुनश्च: पुरविण्याचे आदेश देण्यात येत असून याव्दारे अपील अंतिम करण्यात येत आहे, असे आदेश पारीत केले आहे.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, माहिती अर्जानुसार अपेक्षित असलेली माहिती मिळालेली नाही.

२. आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, नागपूर ग्रामीण (प्र.), श्रीमती ए.जी. सोनेकर व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, नागपूर ग्रामीण (प्र.), श्री. तानाजी ल. गंगावणे उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, अपिलार्थी यांचा दिनांक २५.०३.२०२३ रोजीचा माहिती अर्ज सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय क्र.९ पुणे यांचेकडून दिनांक ०३.०४.२०२३ अन्वये प्राप्त झाला आहे. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, नागपूर ग्रामीण यांनी दिनांक १८.०४.२०२३ रोजी अपिलार्थीस उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.०५.२०२३ रोजी सुनावणी घेवून दिनांक ०१.०६.२०२३ रोजी आदेश पारीत केले आहे. त्यात अपिलर्थी यांचे अपील अंशत: मान्य

करण्यात येवून राज्य जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२ नागपूर ग्रामीण यांनी संबंधित अपिलार्थीस माहितीचा अहवालाची प्रत पुनश्च: पुरविण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी संबंधित अपिलार्थीस माहितीचा अहवालाची प्रत स्वहस्ते दि. ३०.०५.२०२३ रोजीच पुरविण्यात आलेली आहे.

६. निष्कर्ष –

सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८.०४.२०२३ व दिनांक ३०.०५.२०२३ रोजी अपिलार्थीस उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे आज सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु मिळालेल्या माहितीने अपिलार्थी श्री. शेटे यांचे समाधान झाल्याचे दिसून येत नाही.

ही बाब लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, नागपूर (ग्रामीण), सिव्हिल लाईन्स नागपूर यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध नस्तीचे अवलोकन करण्याची संधी तत्काळ म्हणजेच आजच देण्यात यावी, असे आयोगाने जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. ही बाब जन माहिती अधिकारी यांनी मान्य केली. त्यानुसार अपिलार्थी श्री. शेटे यांनीही आजच सह जिल्हा निबंधक वर्ग-२, नागपूर (ग्रामीण), सिव्हिल लाईन्स नागपूर यांच्या कार्यालयात जाऊन संबंधित नस्तीचे अवलोकन करण्यास होकार दिलेला आहे.

तसेच अपिलार्थीने मागितलेली माहिती कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असल्यास ती आजच साक्षांकित करुन अपिलार्थीस देता येईल, असेही उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी सांगितले.

ही बाब लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, नागपूर (ग्रामीण), सिव्हिल लाईन्स नागपूर यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध नस्तीचे अवलोकन करण्याची संधी तत्काळ म्हणजेच आजच देण्यात यावी. अवलोकनाअंती अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती आढळून आल्यास ती त्यांना तत्काळ विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. जर अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नसल्यास तसे अपिलार्थीस कारणांसहीत स्पष्ट लेखी कळवावे, या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील आदेशाच्या अधिन राहून, प्रस्तुतचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १०.०२.२०२६**

जावक क्रमांक 9064 दिनांक 10 FEB 2026